स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच. डी.)

पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

'महानुभाव पंथीय गद्य वाङमयातील पर्यावरणविषयक दृष्टिकोनाचा चिकित्सक अभ्यास'

: संशोधक :

कैलास दत्ता खानसोळे

(MA, B Ed)

: संशोधक मार्गदर्शक :

प्रा. डॉ. हापगुंडे संजय किशनराव

मराठी विभागप्रमुख,

प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड.

: संशोधक केंद्र :

प्रतिभा निकेतन महाविदयालय, नांदेड.

ऑगस्ट २०२३

‘महानुभाव पंथीय गद्य वाङमयातील पर्यावरणविषयक दृष्टिकोनाचा चिकित्सक अभ्यास’

प्रस्तावना :

महाराष्ट्राच्या दृष्टीने बारावे-तेरावे शतक महत्त्वाचे ठरले आहे. या कालखंडात विविध भक्ती संप्रदायाचा उदय झाला. या भक्ती संप्रदायाने धर्म, देव, अध्यात्माच्या साह्याने सामाजिक जीवनाला आकार देण्याचे कार्य केले. जो समाज विविध जाती-पाती, कर्मकांड, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य अशा भेदाभेदजन्य वर्तुळात विखंडित झाला होता. अशा समूह मनाला भक्तीच्या साह्याने ऊर्जा देण्याची कार्य संतांनी लेखणी- वाणींनी केले. म्हणून ज्ञानेश्वराने ‘येरू लोको वाकचातुर्य’ होईल या भूमिकेतून ज्ञानेश्वरी लिहिली. तर, ‘नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी’, हा हेतू ठेवून संत नामदेवांनी अभंग रचना केली. हाच हेतू महानुभव संप्रदायाचासुद्धा होता. त्यांनी सामाजिक समता, स्वच्छता, स्त्री-पुरुष समानता आदी सामाजिक कार्य केले. तसेच स्त्रीस भक्तीचा अधिकार व जीवनासाठी खऱ्या ज्ञानाची ओळख करून देण्याची कार्य केले. अर्थातच समाजाच्या सुखमय, समाधानी, आनंदी व समृद्ध जीवनासाठी नैतिक व जीवनमूल्यची पेरणी कृती-उक्तीतून केल्याचे दिसून येते.

मराठी संतांनी अध्यात्माबरोबरच पर्यावरणास तेवढेच महत्त्व दिले आहे. म्हणून तात्विक ग्रंथ भाष्य ग्रंथ, विवेचनपरग्रंथ, अभंग, ओवी व भारुडातून समाजाला पर्यावरणाबद्दल जागृत करण्याचे कार्य केले आहे. याबद्दल संत साहित्याचे अभ्यासक रामचंद्र देखणे आपल्या “संत साहित्यातील पर्यावरण विचार” या ग्रंथात म्हणतात, "मानवाचे अध्यात्मिक जीवन समृद्ध होण्यासाठी संतांनी भक्तीतत्व, अध्यात्म चिंतन आणि तात्विक मूल्याची शिकवण दिली. तसेच ज्या देहाच्या आधारे परमात्मा स्वरूपाला जायचे आहे, तो देह निरोगी सुदृढ प्रसन्न आणि आनंददायी राहावा यासाठी पर्यावरणाचे मोठेपण सांगितले आहे. ज्याच्या सानिध्यात मानवी देह वावरणार आहे तो निसर्ग साहित्य विपुल व्यापक आणि शुद्ध असायला हवे, अशी संताची धारणा होती. एकीकडे भारतात अनंत काळापासून नांदत असलेली

कृषिसंस्कृती आणि दुसरीकडे तत्त्ववेत्यांनी सांगितलेले पंचमहाभूतांचे महत्त्व या दोहोतून पर्यावरणाच्या संदर्भातील चिंतन प्राचीन ग्रंथात आणि संत साहित्यात प्रभावीपणे आले आहे. जीवन जगताना निसर्गात वावरताना अवतीभवती दिसणारे, जाणवणारे पर्यावरणाचे घटक सर्वसामान्यांच्या परिचयाचेच आहेत. तसेच ते त्यांच्या जीवनात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यात वृक्षवल्ली, डोंगर, नदी, फुले, फळे, पशु- पक्षी, वारा, सूर्य, कीटक, गुरे, वने, अरण्य, पर्जन्य इत्यादी घटकांना कधी उपमा कधी, रूप, कधी सिद्धांत तर कधी दृष्टांत अशा स्वरूपात ठाई ठाई मांडून आपल्या वाङ्मयातून मराठी संतांनी पर्यावरणाची नवी दृष्टी समाजाला दिली आहे." या मतावरून संतांनी मानवी जीवनातील पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आद्य भक्ती संप्रदाय असणाऱ्या महानुभव संप्रदायाने पर्यावरणविषयी अधिक जागृती निर्माण करण्याचे अप्रत्यक्षपणे कार्य केले. म्हणून प्रस्तुत संशोधकाने **'महानुभाव पंथीय गद्य वाङमयातील पर्यावरणविषयक दृष्टिकोनाचा चिकित्सक अभ्यास'** हा विषय निवडला आहे.

महानुभाव संप्रदायाचा कालखंड हा यादवांच्या वैभवशाली राजवटीचा होता. तसेच तेवढ्याच धार्मिक कर्मकांडाचा होता. या काळात श्री चक्रधर स्वामींनी या सर्वांना छेद देण्याचे कार्य केले. भ्रमंती, प्रश्न उत्तरी स्वरूपाचे तत्व विवेचन आणि कृतियुक्तता यामुळे अल्पावधितच महान विद्वान पंडितांचा शिष्य परिवार जमला. श्री चक्रधरांची ज्ञानसंपन्नता, बहुभाषिकत्व, वाकचातुर्य, समतावादी दृष्टी, लोकभाषेचा अनुग्रह आणि समाजसन्मुखता इत्यादी गुणसंपन्नतेच्या आधारे तात्विक अधिष्ठान देऊन नव्या संप्रदायाची मोट बांधली. म्हणून त्यांच्या उत्तरापंथे गमनानंतर म्हइंभटाने श्री नागदेवाचार्यांच्या आदेशाने 'लीळाचरित्र' या संकलित स्वरूपाच्या ग्रंथाची निर्मिती करत; मराठी भाषेला आद्य गद्य चरित्र ग्रंथ दिला. हा ग्रंथ महानुभव साहित्य निर्मितीचा बीजग्रंथ म्हणून ओळखला जातो. पुढे महानुभाव पंथीयांनी मराठी साहित्यात विपुल-वैफुल्यपूर्ण ग्रंथाची भर घातली आहे. त्यात गद्य निर्मिती ही महत्त्वपूर्ण ठरली आहे. हे ग्रंथयादवकालीन सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचा दस्तऐवज ठरले आहेत. त्यामुळे प्रस्तुत संशोधकाने गद्य साहित्यातून पर्यावरणीय कोणते विचार आले आहेत; हे जिज्ञावृत्तीने शोधण्याचा प्रयत्न **'महानुभाव**

पंथीय गद्य वाङमयातील पर्यावरणविषयक दृष्टिकोनाचा चिकित्सक अभ्यास' या संकल्पित विषयाच्या अनुषंगाने करण्यात येईल.

- **संशोधन विषय निवडी विषयीची भूमिका**

महानुभाव संप्रदाय हा महत्त्वाचा भक्ती संप्रदाय म्हणून ओळखला जातो. या संप्रदायाचा एक अनुयायी म्हणून या संप्रदायाच्या विविध अंगाने अभ्यास करण्याची जिज्ञासा आणि ओढ सातत्याने राहिलेली आहे. पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर या विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करण्याची संधी मिळाली तेव्हा-तेव्हा करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून पदव्युत्तर पातळीवर प्रकल्प लेखनासाठी लोककथा स्वरूपी असणारा 'दृष्टांत पाठ' हा ग्रंथ घेतला होता. या ग्रंथात आढळून आलेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक आध्यात्मिक पर्यावरणाबरोबरच सभोवतालचे भौतिक पर्यावरण मोठ्या प्रमाणात आढळून आले. म्हणून मी याविषयी सातत्याने वाचत गेलो. मला महानुभावांच्या गद्यग्रंथाविषयी अधिक ओढ राहिली आहे.

मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात पद्य निर्मितीच्या काळात महानुभाव लेखकांनी गद्य लेखन केले. यात 'स्थानपोथी', 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ', 'आचार्यस्थळ', 'स्मृतिस्थळ', 'गोविंदप्रभू चरित्र', 'लीळाचरित्र', 'प्रमेय दृष्टांत' आदी ग्रंथांचा नामोल्लेख करता येईल. नंतर महानुभाव पंथीयांनी 'सातीग्रंथा'सारखे आद्य उच्च प्रतीची काव्यनिर्मिती केली. अद्वैती तत्त्वज्ञान, स्मरणभक्ती, मार्गरुढी, स्थळ महात्म्य, समताधिष्ठवादी दृष्टी, जीवनमूल्य आणि पर्यावरणवादी विचार आदी सर्वच ग्रंथाचे सूत्रस्वरूप राहिले आहे. यातील सर्वच विषयावर विविध अभ्यासाकांनी विविधांगी अध्ययन केल्याचे दिसून येते. हे अध्ययन पंथीय आणि विद्यापीठ पातळीवर झाल्याचे जाणवते; मात्र महानुभाव पंथाचा 'पर्यावरणविषयक दृष्टिकोन' हा विषय दुर्लक्षित राहिल्याचे मला आढळून आले. म्हणून मी **'महानुभाव पंथीय गद्य वाङमयातील पर्यावरणविषयक दृष्टिकोनाचा चिकित्सक अभ्यास'** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. प्राचीन काळात पर्यावरणाविषयीचा कोणता दृष्टिकोन

होता आणि आज या विषयीची प्रासंगिकता अधोरेखित करणे. तसेच समकालीन समाजात पर्यावरण विषयी जागृती निर्माण करण्यास या विषयाची मदत होईल. तसेच समकालीन लेखकांना पर समकालीन पर्यावरण लेखणीतून आणि कोणकोणत्या आकृतीबंधातून साकारता येईल याचा एक वस्तुपाठ या विषयाच्या अनुषंगाने राहिलं. अशी या विषयाची उपयुक्तता लक्षात घेऊन हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

- **संशोधन विषयाची उद्दिष्टे:**

1) महानुभाव पंथीय गद्य वाङ्मयाचे वेगळेपण शोधणे.

2) महानुभाव पंथीयांच्या गद्यातील पर्यावरण विषयक नोंदणीचा चिकित्सक आढावा घेणे.

3) महानुभाव पंथीय गद्यातील शेती, शेतकरी, विविध पिके आणि शेती विषयक पर्यावरणाचा चिकित्सक अभ्यास करणे.

4) महानुभाव पंथीय लेखक चरित्र नायकाचा पर्यावरणविषयक दृष्टिकोन आणि त्यांची प्रासंगिकता चिकित्सकपणे तपासणे.

5) महानुभाव पंथीय गद्यातून प्रतीत आध्यात्मिक आणि भौतिक पर्यावरणाचा सहसंबंध उलगडणे.

6) महानुभाव पंथीय गद्यातील श्री चक्रधरांचा मानवतावाद आणि तत्त्वज्ञान रूजवण्यात पर्यावरणाचे आणि महत्त्व अधोरेखित करणे.

- **संशोधन विषयाची गृहितकृत्ये:**

1) महानुभाव पंथीय गद्य साहित्यातून इतर संप्रदायापेक्षा पर्यावरणविषयक नोंदी अधिक आल्या आहेत.

2) महानुभाव पंथीयांच्या ‘लीळाचरित्र’, ‘गोविंदप्रभू चरित्र’, ‘स्मृतीस्थळ’ आणि ‘दृष्टांतपाठ’ या ग्रंथातून शेती शेतीचे विविध प्रकार, विविध पिके, कृषिकर्म विषयक ज्ञान आणि शेतीविषयक पर्यावरण अधिक सूक्ष्मपणे आले आहे.

3) महानुभाव पंथीय गद्य साहित्यात पर्यावरण संरक्षणविषयक उदारमतवादी व डोळस दृष्टिकोन दिसून येतो.

4) महानुभाव पंथीयांनी गद्य साहित्यातून पर्यावरणाच्या संरक्षणाचा कृतिशील वस्तुपाठ समाजासमोर ठेवला आहे.

5) महानुभाव पंथीयांनी आध्यात्मास आणि साहित्यास भौतिक पर्यावरणाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले.

6) महानुभाव पंथीयांच्या गद्यग्रंथातून आध्यात्म व तत्व चिंतनातून सर्वसामान्यात पर्यावरणविषयक जागृती घडवून आणली आहे.

- **संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा:**

‘महानुभाव पंथीय गद्य वाङमयातील पर्यावरणविषयक दृष्टिकोनाचा चिकित्सक अभ्यास’ या संशोधन विषयाच्या संशोधनासाठी ‘लीळाचरित्र’, ‘गोविंदप्रभू चरित्र’, ‘स्मृतिस्थळ’ आणि ‘दृष्टांतपाठ’ आदी ग्रंथ आधारभूत मानले आहेत. या ग्रंथात ज्या पर्यावरणविषयक नोंदीं आल्या आहेत. या ग्रंथात प्रतिबिंबित झालेल्या पर्यावरणविषयक दृष्टिकोनांचा सूक्ष्म अभ्यास करणे. ही प्रस्तुत संशोधनाची मर्यादा असेल.

- **संशोधन पद्धती आणि साधनसामुग्री:**

प्रस्तुत संशोधनासाठी निरीक्षण, अन्वयार्थी विश्लेषण आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच संशोधन कालावधीत संशोधनाची गरज लक्षात घेऊन इतर संशोधन पद्धतीचा वापर केला जाईल.

या संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला जाईल. त्यात **'लीळाचरित्र'**, **'गोविंदप्रभू चरित्र'**, **'स्मृतिस्थळ'** **आणि** **'दृष्टांतपाठ'** हे ग्रंथ आधारभूत मानले आहेत. या ग्रंथाबरोबरच इतर प्राचीन संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे आणि विविध वेब पेजचा वापर केला जाईल.

- **संशोधनाचे महत्त्व:**

संत साहित्यात पर्यावरणविषयक प्रसंगपरत्वे अनेक नोंदी आल्या आहेत. यामागील समाजाला आपल्या सभोवतालच्या पर्यावरणविषयी जागृत हेतू करण्याचा होता. त्यात विशेषत्वाने महानुभाव प्रभृतींचे मौलिक योगदान राहिले आहे. म्हणून **'महानुभाव पंथीय गद्य वाङमयातील पर्यावरणविषयक दृष्टिकोनाचा चिकित्सक अभ्यास'** करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन प्रकल्पात केला आहे. या अभ्यासातून निसर्गविषयक उदारमतवादी व मानवतावादी संरक्षण दृष्टिकोन, शेती, कृषिकर्म, कृषिविषयक सूक्ष्मज्ञान आणि शेतीपूरक पर्यावरण. याकडे पाहण्याचा डोळस दृष्टिकोन तयार होईल. तसेच मानवास उपयुक्त असणारे नदी, नाले, डोंगर-दरी, पशु-पक्षी, वन्यप्राणी, वनसंपत्ती, त्यांचे संरक्षण व संवर्धनाच्या पद्धती कशा होत्या. त्याचे चिकित्सक विवेचन केले जाईल. त्यातून समकालीन समाजास पर्यावरण संरक्षणविषयीच्या नवीन कल्पना सूचतील. भौतिक चंगळवादात आणि स्वार्थात अडकलेल्या समाजाला पर्यावरणविषयक सजगता येण्यास मदत होईल. मराठी साहित्य आणि पर्यावरण यांचा परस्परसंबंध कसा असेल? याची कल्पना वाचकास येईल. समकालीन लेखक व विद्वानांना समकालीन पर्यावरण लेखणीतून साकारण्यास मदत होईल यात शंका नाही.

- **संशोधनाची प्रकरणनिहाय रूपरेषा :**

'महानुभाव पंथीय गद्य वाङमयातील पर्यावरणविषयक दृष्टिकोनाचा चिकित्सक अभ्यास' या संशोधन विषयाची मांडणी खालील प्रकरणात करण्याचा मानस आहे.

प्रकरण पहिले : महानुभाव पंथीय गद्य वाङमय : स्वरूप आणि परंपरा

प्रस्तुत प्रकरणात महानुभाव पंथीय गद्य वाङमयाचे स्वरूप आणि परंपरेचा आढावा घेतला जाईल. मराठी भाषेच्या अगदी सुरुवातीच्या काळात महानुभाव संप्रदायाने प्रगल्भ स्वरूपाची साहित्य निर्मिती केली. यास श्री चक्रधरांची लोकभाषाविषयीची आग्रही भूमिका आणि स्मरणभक्ती कारणीभूत असल्याचे दिसून येते. तसेच या संप्रदायामध्ये विविध विषयात नावलौकिक असणाऱ्या विद्वानांचा भरणा होता. त्यामुळे चरित्रग्रंथ, स्थळवर्णनपर ग्रंथ, भाष्यग्रंथ, तत्वविवेचनपर ग्रंथ अशी आशय आणि विषयात विविधता व वैचित्र्यपूर्णता आली आहे. इतर संप्रदायातील मंडळी पद्य लेखन करत होते. तेव्हा महानुभाव पंथीय लेखकांनी गद्य स्वरूपाचे लेखन केले आहे. अर्थातच महानुभाव लेखकांनी प्राचीन काळात सर्वप्रथम गद्य वाङ्मयाची सुरुवात केली, असे म्हणता येईल. नंतर पद्यस्वरूपी लिखाण केले केल्याचे दिसून येते. म्हणून मराठी भाषेला आद्य, गद्य चरित्र ग्रंथ मिळाला. ही गद्याची परंपरा पुढे चालू ठेवण्याचे कार्य महानुभव लेखकांनी केले आहे. याची साक्ष 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभू चरित्र', 'स्मृतिस्थळ', 'दृष्टांतपाठ', 'सूत्रपाठ' 'पूजावसर', 'स्थानपोथी' आदी महत्त्वाचे ग्रंथ देतात. कारण या ग्रंथावरूनच पुढील काव्य ग्रंथाची निर्मिती झालेली आहे. या ग्रंथांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आध्यात्मिक पर्यावरणाचा दस्तावेज होत. तसेच या ग्रंथातून तत्त्वज्ञान निरूपण समर्थपणे झालेले आहे. या ग्रंथात तत्त्वज्ञान आणि जीवनव्यवहाराचा समन्वय अत्यंत कुशलतेने लेखकांनी साधलेला आहे. या गद्यग्रंथांचे भाषिक वैशिष्ट्ये म्हणजे छोटी-छोटी वाक्यरचना व अल्प अक्षरत्व होय. बोली भाषेतील विविध शब्दकळा आणि लोककथेचा समर्पक वापर केला आहे. या

ग्रंथांवर संस्कृत भाषेचा प्रभाव जाणवत असला तरी, भाषिक वेगळेपण जपत वाङमयीन वैभव वाढवले आहे. म्हणून महानुभाव गद्य वाङ्मयाच्या स्वरूप विशेषांची मीमांसा या प्रकरणात करण्यात येईल.

- **प्रकरण दुसरे: महानुभाव पंथीय गद्य वाङमयातील पर्यावरणविषयक नोंदीचा आढावा :**

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने महानुभाव गद्यातील पर्यावरणविषयक नोंदीचा आढावा घेतला जाणार आहे. प्रस्तुत संशोधकाने निवडलेल्या ‘लीळाचरित्र’, ‘गोविंद प्रभूचरित्र’, ‘दृष्टांतपाठ’, ‘स्मृतिस्थळ’ आणि ‘स्थानपोथी’ या ग्रंथात विपुल आशा पर्यावरणविषयक नोंदी आल्या आहेत. या नोंदींचे चार विभागात वर्गीकरण करता येईल. त्यात सामाजिक पर्यावरण, धार्मिक पर्यावरण, सांस्कृतिक पर्यावरण आणि भौतिक पर्यावरण होय. यादवकाळातील समाजव्यवस्था, विविध जाती, विविध व्यवसाय आणि त्यांच्या जीवन जगण्याची साधने यातून आकारत गेलेल्या सामाजिक पर्यावरणाच्या नोंदणीचा परामर्श घेण्यात यईल. यादव काळातील धार्मिक व सांस्कृतिक पर्यावरण हे एकमेकास पूरक राहिले. या पर्यावरणातून आकारास आलेल्या समूह मनाचे विश्लेषण वेगवेगळ्या घटकांच्या आधारे करण्याचा प्रयत्न आहे. तर, भौतिक पर्यावरणास चक्रधर स्वामींनी अत्यंत महत्त्वाचे मानले आहे. म्हणून महानुभाव ग्रंथातून भौतिक पर्यावरणाच्या अनेक नोंदी प्रसंगपरत्वे आल्याचे आढळते. त्यात सांडवा बांधणे, निसर्गाचे संरक्षण करणे, वृक्ष तोड न करणे, दुष्काळी पर्यावरणाच्या विविध नोंदी व उपाय, वन्य प्राणीविषयक विचार, पर्जन्यविषयक दृष्टिकोन, विविध फळांचे प्रकार आणि महत्त्व, 'उपटोनिया कोळी लावणे' या दृष्टांतातून झाडे कलम कशा पद्धतीने केले जाते. याचे शास्त्र तेराव्या शतकात विकसित झाले होते. याचा प्रत्यय आपणास गद्यग्रंथातून येतो. वृक्ष संशोधन व संवर्धनविषयक दृष्टिकोन यातून स्पष्ट होतो. तसेच भौतिक पर्यावरण शुद्ध

राहण्यासाठी आणि विविध रोगराई रोखण्याचे अनेक उपाय चक्रधर स्वामींनी सूचवले आहेत.

वरील मुद्द्यांच्या आधारे महानुभाव पंथीय गद्य वाङमयातील पर्यावरणविषयक नोंदींचा चिकित्सक पद्धतीने नोंद घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच साहित्य आणि पर्यावरण यांचा सहसमन्वय कशा पद्धतीने प्राचीन काळापासून राहिलेला आहे. त्याचा उलगडा या प्रकरणात करण्यात येईल.

- **प्रकरण तिसरे : महानुभाव पंथीय गद्य वाङमयात प्रतिबिंबित संरक्षणविषयक दृष्टिकोनाची चिकित्सा :**

वारकरी संत साहित्यात पर्यावरण संरक्षणविषयक आणि संवर्धनविषयक विचार प्रसंगपरत्वे आलेले आहेत. या विचारांच्या पाऊलखुणा कुठेतरी आपणास महानुभाव साहित्यात दिसून येतात. कारण श्री चक्रधर स्वामी आणि नंतरचे सर्व पंथीय आचार्य अधिक काळ निसर्गाच्या सानिध्यात राहत होते. त्यामुळे त्यांचा निसर्गविषयीचा डोळसदृष्टिकोन विकसित झाला. म्हणून ते आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाकडे खुल्या मनाने आणि सह्रदयतेने पाहतात. याचा प्रत्यय आपणास त्यांच्या आचारविचार आणि लेखणीत दिसून येतो. लीळाचरित्रातील ‘ससिक रक्षण’ या लीळेतून महानुभवांचा वन्यप्राणी, पशु-पक्षी यांच्याविषयीचा अहिंसावादी दृष्टिकोन लक्षात येतो. तसेच पशु-प्राण्याविषयीचा आदर महाभाव ‘महात्म्य हो’ या शब्दातून व्यक्त करतात. नदी, नाले, विहीर, वृक्ष वेली आणि विविध जलस्थाने, पशु-पक्षी व वन्यप्राणी इत्यादी पर्यावरणीय घटक महानुभाव लेखक कवींच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनून येतात. ते मानवी जीवनात पोषकच आहेत. या पर्यावरणीय घटकांचे समतोल राखणे हे मानवाचे कर्तव्य ठरते. म्हणून महानुभव संप्रदायातील लेखकाने व अनुयांनी पर्यावरणीय समतोल, रक्षण व संवर्धनासाठी उपाय सूचवतात.

महानुभाव गद्यग्रंथातील पर्यावरणविषयक दृष्टिकोन विविध लोककथा, रूपके, प्रतिमा, प्रतिक तर कधी दृष्टांताच्या माध्यमातून आलेले आहेत. एकूण मानवी

जीवनात पर्यावरणाचे महत्त्व ओळखून समाजाला त्याविषयी जागृत करण्याचा प्रयत्न महानुभाव पंथीय लेखकांनी केलेला आहे. आजही या विचारांची उपयोगिता असल्यामुळे प्रस्तुत संशोधकांने श्री चक्रधर स्वामीच्या संरक्षणविषयक विचारांची प्रासंगिकता चिकित्सकपणे विश्लेषित करण्याचा प्रयत्न केला जाईल.

- **प्रकरण चौथे : महानुभाव पंथीय गद्य वाङमयातील कृषिविषयक विचारांची चिकित्साः**

मानव मुलतः कृषिसंस्कृतीतूनच विकसित झाला आहे. या कृषिसंस्कृतीने माणसाला समूहत्व प्रदान केले आहे. तसेच जगण्याच्या पद्धती या संस्कृतनेच ठरवले आहेत. म्हणून अनेक प्रभृतींना या संस्कृतीचे आकर्षण राहिले आहे. त्यात संत महात्मे कसे अपवाद ठरतील? म्हणून प्रस्तुत प्रकरणात श्री चक्रधर स्वामीचे आणि विविध गद्य ग्रंथातून आविष्करण झालेल्या कृषिविषयक विचारांचा परामर्श घेण्यात येईल.

महानुभाव पंथीयांच्या ‘लीळाचरित्र’, ‘गोविंद प्रभूचरित्र’, ‘दृष्टांत पाठ’ आणि ‘स्मृतिस्थळ’ या ग्रंथात श्री स्वामींच्या चरित्राच्या संदर्भाने कृषिविषयक विचार येतात. लीळाचरित्रात दोन लीळात श्री चक्रधर स्वामींनी प्रत्यक्षात शेती कसल्याचा उल्लेख आलेला आहे. तर ‘रूमनियाचा दृष्टांत’ ‘धाद्लेयाचा दृष्टांत’, ‘वृक्षत्वचेचा दृष्टांत’, ‘तैनदैलिया वावराचा दृष्टांत’ अशा अनेक दृष्टांतातून शेतीविषयक ज्ञान व शेती विषयक विचार व्यक्त झाले आहेत.

शेती, शेती कर्म, गाई-गुरे, शेतकऱ्यांची स्थिती ह्या सगळ्या गोष्टी संबंधी श्री चक्रधराचे विश्लेषण अचंबित करणारे आहे. शेतीतील पेरणी करणे, कोळपणी करणे, नांगरणी करणे आणि शेतीच्या मशागतीच्या क्रिया ह्या अवघड आहेत. त्या सूक्ष्म निरीक्षणातून आत्मसात करण्याचा सल्ला सारंग पंडितांना देतात. तसेच पिकाचे विविध प्रकार, ते काढणीला आल्याचे निकष, त्यांच्या संरक्षणासाठी गोपन चालवण्याची कौशल्य, फळाच्या विविध जातीचे ज्ञान, डास घालवण्याची शेतकरी

उपाय, शेतीचे विविध प्रकार आणि शेतकऱ्यांच्या विदारक स्थितीचे वर्णन आदी घटकांच्या आधारे श्री चक्रधरांचे कृषिविषयक विचारांचे विश्लेषण मिमासात्मक पद्धतीने येथे केले जाईल. यातून त्यांचा पर्यावरणविषयक दृष्टिकोन आणि मानवी संस्कृतीच्या आधारभूत शेती व्यवसायाच्या वृद्धीसाठीचे उपाय यांचा आढावा या प्रकरणात घेतला जाईल. तसेच या कृषिविषयक विचार आणि कल्पकतेची समकाळातील गरज अधोरेखित केली जाईल.

- **प्रकरण पाचवे: निष्कर्ष व उपसंहार**

वरील चार प्रकरणाच्या आधारे हाती आलेले निष्कर्ष शिफारशी वजा नोंदवले जातील. तसेच या शोध प्रबंधाचा उपसहारांचे लेखन केले जाईल.

संदर्भसूची

1) कोलते वि. भि. (संपा.), लीळाचरित्र, शासकीय प्रत महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक महामंडळ पुणे, 1982

2) कोलते वि. भि. (संपा), गोविंद प्रभू चरित्र, अरुण प्रकाशन, मलकापूर

3) देशपांडे वा. ना., स्मृतिस्थळ, विनाश प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती

4) अविनाश आवलगावकर, महानुभाव साहित्य शोध संचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2006.

5) रमेश आवलगावकर महानुभाव संत व वांङमय, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.

6) कोलते वि. भि. (संपा.), श्री चक्रधर चरित्र, शिक्षण व सेवा विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई 1982

7) कोलते वि. भि. (संपा.), महानुभाव संशोधन खंड एक, अरुण प्रकाशन, मलकापूर 1962

8) कोलते वि. भि., महानुभव तत्वज्ञान, अरुण प्रकाशन, मलकापूर 1956

9) कोळपकर मुरलीधर प्रभाकर, महानुभावांचा इतिहास, प्रकाशक संन्यासी बाबा यवतमाळ, द्वितीय आवृत्ती 2005

10) ठाकरे स्मिता, लीळाचरित्र संशोधन समीक्षा, ओंकार प्रकाशन, अमरावती, प्रथम आवृत्ती 2020

11) तुळपुळे शं. गो. महानुभाव पंथ व त्यांचे वाङमय, व्हीनश प्रकाशन, पुणे, 1976

12) तुळपुळे, शं. गो. महानुभाव गद्य, व्हीनस प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण 1969

13) तळेगावकर पंडित राज दादा, महानुभाव व्याख्या शब्दकोश, कृष्णराज प्रकाशन, नाशिक, 2007

14) देशपांडे य. खु. महानुभावांचे चरित्र ग्रंथ, भारतीय इतिहास संशोधन मंडळ, मुंबई

15) देशपांडे ब्रह्मानंद महानुभाव्य शोधनिबंध खंड एक,राऊळ प्रकाशन, औरंगाबाद 2005

16) मंचरकर रं. बा., धर्म संप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङमय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2020

17) हंसराज जाधव, महानुभावी आख्यान काव्य, दिलीप राज प्रकाशन, पुणे

18) सोमन अंजली, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2005

19) सदा कर्हाडे, संशोधन सिद्धांत आणि पद्धती, लोकवाङमय गृह, मुंबई, 2007

20) रामचंद्र देखणे, संत साहित्यातील पर्यावरणविचार, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 1994

21) महानुभाव आणि वारकरी साहित्य, प्राध्यापक संग्राम फुल्ले, सूर्य मुद्रा प्रकाश, नांदेड 2016

22) संजय जगताप, महानुभाव साहित्यातील स्त्री प्रतिमा, यशोदीप पब्लिकेशन पुणे, 2019

23) संभाजी जाधव, वारकरी संत आणि लौकिक जीवन, ए आर पब्लिशिंग कंपनी, दिल्ली
24) निर्मल कुमार फडकुले, संत सहवास, सुविद्या प्रकाशन, सोलापूर 1995
25) पठाण यु. म., स्मृतीस्थळ, समर्थ प्रकाशन, औरंगाबाद 1974

संशोधक
कैलास दत्ता खानसोळे

संशोधक मार्गदर्शक
प्रा. डॉ. हापगुंडे संजय किसनराव
मराठी विभागप्रमुख,
प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड